# डिजिटल युगातील सुरक्षिततेसाठी पुढाकार; २,८०० हून अधिक विद्यार्थी सायबर जागरूक

By **वॉइस ऑफ महाराष्ट्र न्यूज** August 28, 2026 2

**पुणे | प्रतिनिधी**

डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा सुरक्षित, जबाबदार आणि सजगपणे वापर करावा, या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या '**Cyber Shiksha for Cyber Suraksha**' या सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत **१४ सादरीकरणे यशस्वीपणे पूर्ण झाली असून २,८०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचला आहे.**





**Quick Heal Foundation (QHF)** तर्फे **Maharshi Karve Shri Shikshan Sanstha (MKSSS)** आणि **K. B. Joshi Institute of Information Technology** यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना **सायबर सुरक्षा, ऑनलाइन सुरक्षितता, डिजिटल जबाबदारी, सायबर गुन्हे व धोके, फसवणुकीपासून बचाव आणि सुरक्षित इंटरनेट वापराच्या पद्धती** याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. डिजिटल जगतातील विविध धोक्यांची माहिती देतानाच विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया, ऑनलाइन व्यवहार आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करताना कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही जनजागृती केली जात आहे.